

**बारामती** : सायबर सुरक्षेबाबत कराराप्रसंगी उपस्थित.

# विद्या प्रतिष्ठानचा सायबर सुरक्षेबाबत करार

**बारामती, ता. ५** : येथील विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्यात नुकताच सायबर सुरक्षेसंदर्भात जनजागृती व प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा, डिजिटल सजगता आणि सुरक्षित ऑनलाइन वर्तन याबाबत जागरूकता निर्माण करणे, तसेच प्रशिक्षण कार्यशाळा, स्पर्धा, शिबिरे व विविध उपक्रमांचे आयोजन करणे हा या कराराचा उद्देश आहे.

या वेळी फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, सहयोगी संचालक अजय शिर्के, प्राचार्य डॉ. भरत शिंदे, उपप्राचार्य डॉ. श्यामराव घाडगे, विभाग प्रमुख महेश पवार, समन्वयक अक्षय भोसले आदी उपस्थित होते. ''सायबर सुरक्षेच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर हा करार काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल भविष्य घडवण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल,'' असे डॉ. शिंदे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले. शिर्के म्हणाले, ''विद्यार्थ्यांमध्ये सायबर सजगता निर्माण करणे हे आमचे मुख्य ध्येय असून, शैक्षणिक संस्थांशी भागीदारी करून आम्ही ते साकार करीत आहोत.''